प्रेस नोट दिनांक १७/१२/२०२१

| | |
|---|---|
| अॅसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. दिपक शांताराम पाष्टे वय.४२ वर्षे, पद- शिपाई, (वर्ग-४) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चिपळुण ता. चिपळुण रा. घर नंबर ७८, मु. पोष्ट पिंपळी खुर्द, मधलीवाडी ता. चिपळुण जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | परकार कॉम्प्लेक्स इमारतीमधील दुसरा माळा येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था चिपळुण कार्यालय येथे ता. चिपळुण |
| तक्रार अर्जातील मागणी केलेली लाचेची रक्कम | १२,०००/-रुपये |
| तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | ७,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचा वकीली व्यवसाय आहे. बांधकाम व्यवसायिक यांचे सावर्डे येथील एका इमारतीची गृहनिर्माण संस्था म्हणुन नोंदणी करणेकरीता सदर बांधकाम व्यवसायिक यांनी तक्रारदार यांचेवतीने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था चिपळुण कार्यालयामध्ये अर्ज सादर केला होता. सदर इमारतीचे गृहनिर्माण संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र, संस्थेची मंजुर उपविधी, ज्ञापन व सहकारी संस्था नोंदणी अधिसुचना ताब्यात देणेकरीता लोकसेवक श्री. पाष्टे यांनी कार्यालयातील वरीष्ठ अधिका-यांसाठी १२,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी येथे दिनांक १४/१२/२०२१ रोजी दिलेली आहे.<br>सदर तकारीचे अनुषंगाने दिनांक १४/१२/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक श्री. दिपक शांताराम पाष्टे वय. ४२ वर्षे, पद- शिपाई, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चिपळुण यांनी सदर इमारतीचे गृहनिर्माण संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र, संस्थेची मंजुर उपविधी, ज्ञापन व सहकारी संस्था नोंदणी अधिसुचना ताब्यात देणेकरीता लोकसेवक श्री. पाष्टे यांनी कार्यालयातील वरीष्ठ अधिकारी यांचेसाठी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ७,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार इमारतीचे गृहनिर्माण संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र, संस्थेची मंजुर उपविधी, ज्ञापन व सहकारी संस्था नोंदणी अधिसुचना तक्रारदार यांचे ताब्यात देण्याकरीता तक्रारदार यांचेकडुन मागणी केलेल्याप्रमाणे रक्कमेपैकी ७,०००/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्विकारल्यानंतर श्री. दिपक शांताराम पाष्टे वय. ४२ वर्षे, पद- शिपाई, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चिपळुण यांना दिनांक १७/१२/२०२१ रोजी १२.३० वा. परकार कॉम्प्लेक्स इमारतीमधील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय चिपळुण येथे पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>सदरची सापळा कारवाई पोलीस उपअधीक्षक श्री. सुशांत चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती नेत्रा जाधव, सपोफौ संदीप ओगले, पोलीस हवालदार संतोष कोळेकर, विशाल नलावडे, पोलीस नाईक दिपक आंबेकर पोलीस शिपाई हेमंत पवार, राजेश गावकर यांनी केली आहे. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893 , 9823233044, 8691824333
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

(नेत्रा एन. जाधव)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी.



Scanned with CamScanner